| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHDH040001402024 | दाखल दिनांक | : | २८/०२/२०२४ | | |
| | नोंदणी दिनांक | : | २८/०२/२०२४ | | |
| | निकाल दिनांक | : | २५/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | **वर्ष** | **महिने** | **दिवस** |
| | | | ०२ | ०० | २६ |

भाग अ

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(।))

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक ०२), दोंडाईचा यांचे न्यायालयात**

**( न्यायीक अधिकारी – आर.डी.पवार )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६१/२०२४**

**निशाणी क्रमांक :– १९/ब**

**दोंडाईचा पोलीस स्टेशन यांची पहिली खबर क्रमांक २८७/२०२३**

**(गुन्हा : मुंबई दारुबंदी प्रतिबंधित कायदा, १९४९ कलम ६५ (ई) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादीचे नाव | | **सरकारतर्फे**<br>पो.कॉ.१७१४ प्रविण उत्तम निकुंबे, नेमणूक दोंडाईचा पोलीस स्टेशन, ता. शिंदखेडा, जि. धुळे |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. ए.ए.लाली, सरकारी अभियोक्ता** |
| आरोपीचे नाव | | **कैलास संतोष कोळी,**<br>वय – ३० वर्षे, धंदा – मजुरी,<br>राहणार – साहूर, ता. शिंदखेडा, जि. धुळे |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. एस.ई.भावसार, आरोपीतर्फे विधीज्ञ** |

भाग ब

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(॥))

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०८/०९/२०२३ |

| | |
|---|---|
| फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | ०८/०९/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २८/०२/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २९/११/२०२५ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | १६/०१/२०२६ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | २४/०२/२०२६ |
| निकाल दिनांक | २५/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | निरंक |

**आरोपीचा तपशिल**

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष /दोषी | किती शिक्षा सुनविण्यात आली | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कैलास संतोष कोळी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१-अ अन्वये नोटीस | २८/०२/२०२४ | मुंबई दारुबंदी प्रतिबंधित कायदा, १९४९ कलम ६५ (ई) अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

****************************************************************

**-: न्यायनिर्णय :-**

**( घोषीत दिनांकः- २५ मार्च, २०२६ )**

आरोपीविरुध्द सदर खटला मुंबई दारुबंदी प्रतिबंधित कायदा, १९४९ कलम ६५(ई) अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे संक्षिप्त म्हणणे येणेप्रमाणे –**

**०२.** दिनांक ०८/०९/२०२३ रोजी मौजे साहूर, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे तापी नदीकिनारी पान टपरीच्या आडोशाला आरोपी हा आपल्या स्वतःचे फायद्यासाठी

अवैधरित्या देशी–विदेशी दारुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशान कब्जात बाळगताना मिळून आला म्हणून दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक २८७/२०२३, दिनांक ०८/०९/२०२३ रोजी मुंबई दारुबंदी प्रतिबंधित कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे नोंद झाली. सदर गुन्हयाचा तपास श्री. पो.ना.४६७ अभय यशवंत गवते व पो.हे.कॉ.१२३७२ सुनिल रतिलाल महाजन यांनी पूर्ण करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** दिनांक २९/११/२०२५ रोजी निशाणी क्रमांक ११ अन्वये आरोपीचे प्रतिकथन नोंदवून ते त्याच्या भाषेत समजावून सांगितले असता आरोपीने दोषारोप अमान्य करुन संपरीक्षा चालविण्याची विनंती केली, सबब अभियोग पक्षाचे पुरावे नोंदविण्यात आले. अभियोग पक्षास वारंवार संधी देऊनही साक्षीदार हजर केले नाहीत. त्यामुळे निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन निशाणी क्रमांक १८ वर नोंदविण्यात आले. आरोपीने त्याचे निवेदनात त्याचेवरील आरोप नाकारुन खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा बचाव घेतला.

**०४.** अभियोग पक्ष आरोपींच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उभय पक्षाच्या परस्पर विधानांचा विचार करुन खालील प्रमाणे प्रश्न अधोरेखित करण्यात आले व त्यावर खालील नमूद करणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे देण्यात आला.

| अ.क्र | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८/०९/२०२३ रोजी मौजे साहूर, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे तापी नदीकिनारी पान टपरीच्या आडोशाला आरोपी हा आपल्या स्वतःचे फायद्यासाठी अवैधरित्या देशी–विदेशी दारुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आला म्हणून आरोपीने मुंबई प्रतिबंधित अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ...नाही. |

| अ.क्र | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| २. | कोणता आदेश ? | – आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

**प्रश्न क्रमांक १ साठी –**

**०५.** अभियोगपक्षातर्फे गुन्हा सिध्दतेसाठी अभियोग पक्षातर्फे एकूण ०२ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र. १ कृष्णा जगन माळवे यांनी त्यांच्या निशाणी क्रमांक १४ वरील पुराव्यात अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सदरहू पंचनाम्यावरील पंच साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारांच्या उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या पंचनाम्यावरील सदरहू पंच साक्षीदाराने आरोपीविरुध्द काहीही कथन केले नाही. उलट पंचनाम्यातील मजकूर त्यांनी नाकारला आहे. त्यामुळे स्वतंत्र पंच साक्षीदाराच्या पुराव्यातून अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करु शकलेला नाही.

**०६.** अभियोगपक्षातर्फे गुन्हा सिध्दतेसाठी तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ०२ फिर्यादी पो.कॉ.१७१४ प्रविण उत्तम निकुंभे यांनी त्यांच्या निशाणी क्रमांक १६ वरील पुराव्यात असे सांगितले की, दिनांक ०८/०९/२०२३ रोजी ते पोलीस स्टेशनला हजर असताना पो.नि. पवार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, साहूर गावात तापी नदीकिनारी टपरीच्या आडोशाला एक इसम अवैधरित्या देशी–विदेशी दारुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशान कब्जात बाळगून आहे. पोलिसांनी पंचासह घटनास्थळी शोध घेऊन पंचासमक्ष त्या इसमास पकडले असता त्याने त्याचे नांव कैलास संतोष कोळी असे सांगितले. त्याच्या ताब्यात देशी दारु टँगो पंचच्या २० सीलबंद बाटल्या प्रत्येकी ९० मि.ली., ०३ मॅक्डॉल १८० मि.ली.च्या सीलबंद बाटल्या असा मुद्देमाल आढळून आला. श्री. गवते यांनी जप्त मुद्देमालांपैकी

प्रत्येकी एक सीलबंद बाटली नमुन्यासाठी काढून घेऊन बाटलीच्या बुचावर व पृष्ठभागावर पंचांचे व त्यांच्या सह्यांचे लेबल लावले.

०७. पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर आरोपीला मुद्देमालासह ताब्यात घेऊन सरकार पक्षातर्फे दिनांक ०८/०९/२०२३ रोजी आरोपीविरुध्द फिर्याद निशाणी क्रमांक १७ दिली.

०८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात प्रस्तुत साक्षीदाराने असे मान्य व कबूल केले आहे की, छाप्याकामी जाण्याआधी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती, घटनास्थळाच्या चतु:सीमा सांगता येणार नाहीत, छाप्याकामी ज्या खाजगी वाहनाने ते घटनास्थळी गेले होते त्याचा वाहन क्रमांक व वाहन चालकाचे नांव सांगता येणार नाही, जप्त मुद्देमालावरील बॅच नंबर सांगता येणार नाही, असे कथन केले आहे. एकंदीतच फिर्यादी साक्षीदाराने उपरोक्त बाबी आपल्या पुराव्यात मान्य व कबूल केल्यामुळे सदर साक्षीदाराच्या पुराव्यावर शंका निर्माण होण्यास वाव आहे. तसेच फिर्यादीने आपल्या पुराव्यात नमूद केलेला जप्त मुद्देमाल व दोषारोप पत्रात दर्शविलेला जप्त मुद्देमाल यात देखील तफावत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे देखील सदर फिर्यादी साक्षीदाराच्या पुराव्यावर संशय निर्माण होत आहे.

०९. एकंदरीत वरील सर्व चर्चेवरुन व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्दतेकामी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झालेला नाही. तसेच जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला हे स्पष्ट झालेले नाही. त्याचबरोबर रासायनिक पृथ्थ:करण प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त करणेसाठी जप्त मुद्देमालाबाबत घटनास्थळावरील पंच साक्षीदारांनी काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे घटनास्थळाजवळील स्वतंत्र पंच साक्षीदारांचा पुरावा अभियोग पक्षातर्फे न घेतल्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल ही देशी दारुच होती, ही बाब अभियोग पक्ष संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द करु शकलेला नाही.

**१०.** वरील सर्व कारणांचा विचार करता आरोपी त्याच्या ताब्यात विना परवाना देशी विदेशी दारुचा साठा कब्जात बाळगतांना मिळून आला, हे दोषारोप निःसंशयपणे तसेच सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे, या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे. परिणामी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक २ करिता –**

**११.** वरील विवेचनेच्या अनुषंगाने प्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, प्रश्न क्रमांक २ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| आ दे श | |
|---|---|
| १. | आरोपी **कैलास संतोष कोळी** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये मुंबई दारुबंदी प्रतिबंधित कायदा,१९४९ कलम ६५(ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येतो. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये पुर्ततेकरीता रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे. |
| ४. | जप्त मुद्देमाल देशी दारु टँगो पंच कंपनीची ९० मि.ली. च्या ४० सिलबंद बाटल्या नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा व त्याचा सविस्तर पंचनामा करुन तसा अहवाल या न्यायलायास सादर करावा. |

सही/–

( आर.डी.पवार )

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

(न्यायालय क्रमांक ०२)

स्थळः– धुळे.

दिनांकः– २५/०३/२०२६

## परिशिष्ट

**भाग क**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद (III))**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कृष्णा जगन माळवे | पंच | **१४** |
| २. | पो.कॉ.प्रविण उत्तम निकुंबे | फिर्यादी | **१६** |

**ब) बचावाचे साक्षीदार** – नाही.

**क) न्यायालयीन साक्षीदार** – नाही.

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन निशाणी**

**अ) अभियोग पक्ष न्यायालयीन निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | १५ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदाराची अ. क्र. १ वरील सही |
| २. | १६ | फिर्यादवरील फिर्यादीची सही |

**ब) बचावपक्ष निशाणी – निशाणी काही नाही**

**क) न्यायालयातर्फे निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | | |

**ड) सामग्री वस्तु : निरंक.**

सही/–

स्थळः– धुळे. ( आर.डी.पवार )

दिनांकः– २५/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

(न्यायालय क्रमांक ०२)

– **प्रमाणपत्र** –

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | सुनिल डी. मासुळे, |
| न्यायालयाचे नांव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा (न्यायालय क्रमांक ०२) |
| पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक | :– | २५/०३/२०२६ |

सही/–

लघुलेखक